संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांचे कार्यालय
मु.पो.ता.वैराट रोड, चिखलदरा ता.चिखलदरा जि.अमरावती पिन-444 807
ई-मेल-principal.mfrc933@gmail.com फोन नं.07220-230230

जा.क्रमांक:कक्ष:-03/सं.व.प्र.सं.चि./शिलि/ 428 /2025-26 चिखलदरा 444 807, दिनांक:- 23.2.2026

प्रति,
मा. उप वनसंरक्षक,
( शिक्षण व प्रशिक्षण )
म.रा.पुणे.

**विषय**:- माहे जानेवारी 2026 ची वन शैक्षणिक वार्ता सादर करणे बाबत.
**संदर्भ**:- आपले कार्यालयीन पत्र क्रमांक : कक्ष-1/प्रशिक्षण/187/2025-26 दिनांक 25/06/2025.

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथील सरळ सेवा प्रविष्ठ नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी तुकडी क्रमांक 63 मधील प्रशिक्षणार्थीचे व वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले कॅम्पा योजने अंतर्गत वनपाल व लिपीक / लेखापाल यांचे 30 व 45 दिवसीय दिर्घ मुदत पायाभुत कालावधी प्रशिक्षणामधील प्रशिक्षणार्थींचे कार्यक्रम संबंधाने सुरु असलेल्या विविध प्रशिक्षण कार्यक्रमाचा दिनांक 01/01/2026 ते 31/01/2026 पर्यंतचा मासिक शैक्षणिक अहवाल सोबत सहपत्रित करुन अवलोकनार्थ व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सविनय सादर.

**सहपत्र**:- वरील प्रमाणे. ( पेज क्र. 01 ते 61 )

( कु. मुक्ताबाई वि. टेकाळे )
संचालक,
वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा.

**प्रतिलिपी** :- मा. अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण) म.रा.चंद्रपूर यांना माहितीस सविनय सादर.

( कु. मुक्ताबाई वि. टेकाळे )
संचालक,
वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा.

Scanned with OKEN Scanner

# * प्रस्तावना *

वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा ही महाराष्ट्र राज्यातील वन विभागाच्या प्रशिक्षण क्षेत्रातील एक **अग्रगण्य व मान्यताप्राप्त** संस्था आहे. संस्थेमार्फत नवनियुक्त व कार्यरत वन कर्मचाऱ्यांना **गुणवत्तापूर्ण** आणि **शिस्तबध्द** प्रशिक्षण प्रदान करण्याचे कार्य सातत्याने करण्यात येते.

**दिनांक** 01/10/2025 पासुन संस्थेमध्ये सरळ सेवा नवनियुक्त अप्रशिक्षित **वनरक्षक** प्रशिक्षणार्थी **तुकडी क्र**. 63 यांचे सहा महिन्याचे **निवासी प्रशिक्षण** सुरु करण्यात आले आहे. यासोबतच, **कॅम्पा योजने** अंतर्गत **वनपाल** यांचे 30 दिवसीय दिर्घ मुदत पायाभुत प्रशिक्षण (प्रशिक्षण कालावधी दि. 23/12/2025 ते 21/01/2026) व **लिपीक / लेखापाल** यांचे 45 दिवसीय दिर्घ मुदत पायाभुत प्रशिक्षण (प्रशिक्षण कालावधी दि. 15/12/2025 ते 28/01/2026) या कालावधीमध्ये **एकुण 02 सत्रांमध्ये** प्रशिक्षण आयोजीत करण्यात आले.

**दिनांक** 01/01/2026 **ते** 31/01/2026 या कालावधीत, संस्थेच्या **संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** यांच्या सक्षम नेतृत्व व मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणार्थींसाठी विविध शैक्षणिक, प्रात्यक्षिक, कौशल्यविकास व वनसंवर्धनास पूरक उपक्रम राबविण्यात आले. प्रशिक्षणाच्या गुणवत्तेस चालना देणारे आणि प्रशिक्षणार्थींचा सर्वांगीण विकासास हातभार लावणारे हे उपक्रम नियोजित व शिस्तबध्द पध्दतीने पार पडले.

सदर मासिक शैक्षणिक अहवालामध्ये दिनांक 01/01/2026 **ते** 31/01/2026 या कालावधीत राबविण्यात आलेल्या प्रशिक्षण उपक्रमांचा संक्षिप्त आढावा देण्यात आलेला आहे.

या अहवालाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे प्रशिक्षण कार्यक्रमातील विविध शैक्षणिक व प्रात्यक्षिक घटकांची स्पष्ट, शिस्तबध्द आणि कालानुक्रमिक नोंद सादर करणे. या माध्यमातून संस्थेतील प्रशिक्षणाची कार्यपध्दती, प्रशिक्षणार्थींची प्रगती, सत्रांची परिणामकारकता, तसेच एकंदर शैक्षणिक वातावरण यांचा समावेश असलेली संपूर्ण माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवणे अपेक्षित आहे.

हा अहवाल पुढील प्रशिक्षण सत्रांच्या नियोजनासाठी मार्गदर्शक ठरणारा असून, प्रशिक्षणाच्या गुणवत्ता नियंत्रणात तसेच धोरणात्मक निर्णय प्रक्रियेस सहाय्यक ठरेल. संस्थेमध्ये सुरु असलेल्या प्रशिक्षण उपक्रमांची पारदर्शक, संक्षिप्त व विश्लेषणात्मक माहिती या अहवालाच्या माध्यमातून प्रस्तुत करण्यात आलेली आहे.

# * अनुक्रमणिका *


| अ.क्र. | कार्यक्रमाचे नाव | पेज नं. |
|---|---|---|
| 01 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 प्रथम विदर्भ अभ्यास दौरा. ( दि. 05/01/2026 ते 13/01/2026 ) | 3 ते 10 |
| 02 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 द्वितीय सत्र अभ्यासक्रम. | 11 ते 13 |
| 03 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांची WCT या विषयावर Workshop. (दि. 20/01/2026) ( प्रशिक्षणाव्यतीरीक्त ) | 14 |
| 04 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांना GPS व GIS या विषयावर प्रशिक्षण. (दि. 23/01/2026) ( प्रशिक्षणाव्यतीरीक्त ) | 15 |
| 05 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांना रोपवन या विषयावर प्रशिक्षण. ( प्रशिक्षणाव्यतीरीक्त ) | 16 |
| 06 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांचा कवायत व खेळ माहे जानेवारी 2026. | 17 ते 24 |
| 07 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांचा संस्थेतील क्षेत्रीय कामे माहे जानेवारी 2026. | 25 ते 26 |
| 08 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांचा संस्थेतील परीसरामध्ये क्षेत्रीय अभ्यास दौरा. (दि. 22/01/2026) | 27 |
| 09 | MSTrIPES Ecological APP बाबत कार्यशाळा. (दि. 02/01/2026) | 28 |
| 10 | सावित्रीबाई फुले यांची जयंती. (दि. 03/01/2026) | 29 |
| 11 | जिजाऊ माँ साहेब व स्वामी विवेकानंद यांची जयंती. (दि. 12/01/2026) | 30 |
| 12 | नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांची जयंती. (दि. 23/01/2026) | 31 |
| 13 | प्रजासत्ताक दिवस 26 जानेवारी 2026. | 32 |
| 14 | रक्तदान शिबीर. (दि. 27/01/2026) | 33 |
| 15 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र.63 यांची विदर्भ अभ्यास दौरा परीक्षा. (दि.29/01/26) | 34 |
| 16 | हुतात्मा दिवस. (दि. 30/01/2026) | 35 |
| 17 | वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे कॅम्पा योजने अंतर्गत लिपिक / लेखापाल व वनपाल यांचे 30 व 45 दिवसीय दिर्घ मुदत पायाभुत प्रशिक्षण कार्यक्रम. ( माहे जानेवारी 2026 ) | 36 ते 59 |
| 18 | वृत्तपत्र कात्रणे. | 60 ते 61 |

# 01. नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 चा विदर्भ शैक्षणिक अभ्यास दौरा कार्यक्रम. ( दि. 05/01/2026 ते 13/01/2026 )

## ( ज्ञानगंगा अभयारन्य )



वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथील नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी तुकडी क्र. 63 चे सर्व प्रशिक्षणार्थी यांचा दिनांक **05/01/2026 ते 13/01/2026** या कालावधी मध्ये **विदर्भ शैक्षणिक अभ्यास दौरा** आयोजित करण्यात आला होता. सदर कालावधी मध्ये सर्व प्रशिक्षणार्थी यांनी दौऱ्या दरम्यान खालील प्रमाणे विविध ठिकाणांवर भेट दिली.

| अ.क्र. | दिनांक व वार | भेटीचे ठिकाण | भेटीचे कारण |
|---|---|---|---|
| 01 | 05/01/2026 सोमवार | **ज्ञानगंगा अभयारण्य खामगाव** | ज्ञानगंगा अभयारण्यात भेट देऊन वन जमिनीवरील चराई नियंत्रणासाठी केलेल्या प्रयत्नांचा अभ्यास करणे व चराई युनिट्स ची माहितीअधिकारी परिक्षेत्र वन, खामगाव परिसरातील सामाजिक वनिकरणाच्या रोडसाईड रोपवन गट लागवड कामाला भेट. |
| 02 | 06/01/2026 मंगळवार | **शेगाव ते लोणार सरोवर** | लोणार सरोवर येथील सरोवर परिसरातील वनसंवर्धन व जैव विविधता अभ्यास करणे. |
| 03 | 07/01/2026 बुधवार | **यवतमाळ ते पांढरकवडा टिपेश्वर अभयारण्य** | यवतमाळ वनपरीक्षेत्रातील उमरडा येथील नैसर्गिक चंदन वृक्षाच्या भागास भेट व नर्सरी कामे तसेच जल संधारण वन्यजीव संवर्धन व वनक्षेत्र सुरक्षा कामांचा अभ्यास करुन टिपेश्वर अभयारण्यास भेट व सफारी करुन आंतरराज्यीय पिंपळखुटी नाका, पिंपळखुटी भेट. |
| 04 | 08/01/2026 गुरुवार | **वन अकादमी चंद्रपूर/ विसापुर बॉटनीकल गार्डन** | वनस्पतींच्या प्रजातींच्या विविधता, त्यांची पर्यावरणीय भूमिका आणि वनस्पति संवर्धनाचे महत्व जाणून घेण्यासाठी विसापूर येथील बॉटनीकल गार्डनला भेट. संचालक, वन अकादमी चंद्रपूर यांचेशी भेट. |
| 05 | 09/01/2026 शुक्रवार | **ताडोबा** | 1. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प भेट. इको टुरिझम व पर्यटणामध्ये स्थानिकांचा सहभाग, मानव वन्यजीव संघर्ष व अवैध शिकार या मधील आव्हानांबद्दल अभ्यास व समस्या प्रभावीपणे मधील हाताळण्याबाबत माहिती घेणे. 2. वन्यजीव संवर्धन आणि व्यवस्थापन बाबत अभ्यास. 3. वाघांचा मागोवा आणि निरीक्षण करुन नोंद घेण्यामध्ये वनरक्षकांची भूमिका. |
| 06 | 10/01/2026 शनिवार | **नवेगाव बांध** | 1. प्रवासादरम्यान ब्रम्हपुरी आणि वडसा येथील वृक्षारोपन आणि रोपवाटिकेला भेट.<br>2. नवेगावबांध येथील पर्यटन संकुलास भेट आणि पर्यटन अभ्यास. |
| 07 | 11/01/2026 रविवार | **राष्ट्रीय उद्यान व पुनर्वसन गावास भेट** | 1. नवेगाव राष्ट्रीय उद्यानाला भेट आणि जलीय परिसंस्थेचे व्यवस्थापन कसे केले जाते याचा अभ्यास करणे. 2. राष्ट्रीय उद्यानातील गावांचा स्वेच्छिक पुनरवसनाच्या प्रक्रियेचा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | आणि परिणामांचा अभ्यास करणे. 3. शिकार विरोधी शिबिर आणि एम स्ट्रिप पेट्रोलिंगच्या कार्याचा अभ्यास करणे. |
| 08 | 12/01/2026 सोमवार | **नागपूर सालेकसा चुलबंद** | 1. वन विकास महामंडळाच्या चुलबंद नर्सरीला भेट देणे. 2. सालेकसा येथील स्थानिक नागरिकांनी केलेल्या पर्यावरणीय उपक्रमांचे व हाजरा फॉल व्यवस्थापन याबाबतचा अभ्यास. |
| 09 | 13/01/2026 मंगळवार | **T.T.C सेंटर गोरेवाडा** | गोरेवाडा येथील Transit Treatment Center येथे भेट.<br>पुढील प्रवास वन प्रशिक्षण संस्था चिखलदरा. |

## विदर्भ शैक्षणिक अभ्यास दौरा

### ( गोरेवाडा येथील Transist Treatment Centre )





## विदर्भ शैक्षणिक अभ्यास दौरा ( गोरेवाडा येथील Transist Treatment Centre )











## विदर्भ शैक्षणिक अभ्यास दौरा

## ( महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन )



## ( सालेकसा येथील हाजरा फॉल )





## विदर्भ शैक्षणिक अभ्यास दौरा ( सालेकसा येथील हाजरा फॉल )






**विदर्भ शैक्षणिक अभ्यास दौरा**

**( सालेकसा येथील हाजरा फॉल )**



**( चुलबंद नर्सरी )**







## विदर्भ शैक्षणिक अभ्यास दौरा
## बॉटनीकल गार्डन विसापुर





# 02. नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63
# द्वितीय सत्र अभ्यासक्रम.









## वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 द्वितीय सत्र अभ्यासक्रम.

वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे **दि. 01/10/2025** पासुन नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी **सत्र क्र. 63** यांच्या **सहा महिने** कालावधी प्रशिक्षणातील पथम सत्र पुर्ण झाले असुन द्वितीय सत्राला सुरुवात झाली असुन सदर प्रशिक्षणार्थींचा **द्वितीय सत्र** अभ्यासक्रम खाली दिलेल्या तक्ता प्रमाणे सुरु करण्यात आले.

| सरळ सेवा प्रविष्ठ अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षण सत्र क्र. 63 (कालावधी दि. 01/10/2025 ते 29/03/2026) | | | |
|---|---|---|---|
| **अ. क्र** | **विषय** | **व्याख्याते** | **विषयनिहाय माहिती** |
| 01 | **कवायत** | श्री. एस.एस. आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा.<br>श्री. महादेव धुर्वे ( कत्रांटी क.शि. व.प्र.सं.चिखलदरा )<br>श्री. नितीन बघाये ( कत्रांटी क.शि. व.प्र.सं.चिखलदरा ) | **कवायत व खेळ (**Drill and Sports)<br>प्रशिक्षणार्थ्यांना शारीरिक क्षमतेसाठी दैनिक कवायत व विविध खेळांचे प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये पथसंचलन, व्यायाम, लष्करी शिस्त, तसेच फुटबॉल, व्हॉलीबॉल इत्यादी खेळांचा समावेश होता.<br>**उद्देश:**<br>शारीरिक तंदुरुस्ती, टीमवर्क, व शिस्त यांचे महत्त्व पटवून देणे. |
| 02 | **वनसंरक्षण** | श्री. एस. एन. गुल्हाने, सहा. वनसंरक्षक (से.नि.) | **उद्देश**: वन संपदेचे तोड, अतिक्रमण, तस्करी व वनआग यापासून संरक्षण करणे. जैवविविधतेचे संवर्धन करणे. वनरक्षकांची जबाबदारी, अधिकार व कर्तव्यांची जाणीव करुन देणे.<br>**मुख्य घटक**: वनआग प्रतिबंध व नियंत्रण. अवैध वृक्षतोड व वाहतूक रोखणे. अतिक्रमण प्रतिबंध. वन्यजीव संरक्षण. वन कायदे व नियम ( वन अधिनियम, वन्यजीव संरक्षण अधिनियम ) गस्त व संरक्षणात्मक उपाय. |
| 03 | **संयुक्त वनव्यवस्थापन** | श्री. एस. बी. धर्माधिकारी, सहा. वनसंरक्षक, ( से. नि. ) | **उद्देश** : स्थानिक लोकांचा वनसंवर्धनात सहभाग वाढवणे. वन व ग्रामस्थ यांच्यात सहकार्य निर्माण करणे. वनसंपत्तीचा शाश्वत वापर सुनिश्चित करणे.<br>**मुख्य घटक** : संयुक्त वन व्यवस्थापन संकल्पना. वन संरक्षण समित्या (VSS) ग्रामस्थांचे हक्क व जबाबदाऱ्या. वनविभागाची भूमीका. लाभ वाटप प्रणाली. सामाजिक वनीकरणाशी संबंध. |
| 04 | **वनव्यवस्थापन** | कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | **उद्देश** : वनसंपत्तीचा नियोजित व शाश्वत वापर करणे. वनांचे उत्पादन व संरक्षण यामध्ये समतोल साधणे. दीर्घकालीन वन व्यवस्थापन नियोजन समजून घेणे.<br>**मुख्य घटक**: कार्ययोजना (Working Plan ) वन क्षेत्रांचे वर्गीकरण. तोड व पुनरुत्पादन पध्दती. वन नोंदी व अभिलेख. निरीक्षण व मूल्यांकन. वनरक्षकांची भूमिका. |
| 05 | **वनउपयोगिकरन** | श्री. आर. बी. गिरी, वनपरिक्षेत्र अधिकारी, ( से. नि. ) | **उद्देश : वन उपयोगिता (**Forest Utilization) वनसंपत्तीचा शाश्वत उपयोग कसा करावा हे शिकवण्यात आले.<br>**मुख्य घटक**: इंधन, औषधी वनस्पती, बांबू, गवत यांचा उपयोग स्थानिक समुदायाचा सहभाग बाजारपेठेतील मागणी व पूर्ती व्यवस्थापन. |
| 06 | **लेखा व कार्यालयीन कामकाज पध्दती** | श्री. जी.टी.महाजन, लेखाधिकारी, ( से. नि. ) | **लेखा व कार्यप्रणाली (**Accounts and Procedure)<br>वनविभागातील आर्थिक व्यवहार व प्रशासकीय प्रक्रिया समजावून देण्यात आली. अभ्यासाचे भाग: लेखा पुस्तिका व नोंदी, सरकारी निधीचा उपयोग, बजेट तयार करणे, रिपोर्ट लेखन व सादरीकरण. |
| 07 | **वनसर्व्हेक्षण** | श्री. एस. व्ही. कुंभकर्ण सर. | **उद्देश**: 1. वनक्षेत्राचे मोजमाप करणे. 2. वनसंपत्तीचे मुल्यांकन. 3. वन व्यवस्थापनासाठी माहिती मिळवणे. 4. वनसंरक्षण व संवर्धन. 5. वनविकास व नियोजन. 6. शासकीय नोंदी व कायदेशीर उपयोग.<br>**मुख्य घटक** : 1. क्षेत्र सर्व्हेक्षण. 2. नकाशा तयार करणे. 3. नमुना पध्दत. 4. वृक्ष मोजमाप. 5. रिमोट सेन्सिंग व GIS. 6. डेटा संकलन व विश्लेषण. 7. वन प्रकार वर्गीकरण. |
| 08 | **संगणक** | श्री. आनंद पिडीआर, तालुका व्यवस्थापक, आपले सेवा केंद्र, पंचायत समिती चिखलदरा. | **संगणक (**Computer)<br>प्रशिक्षणार्थ्यांना संगणकाचे मूलभूत ज्ञान देण्यात आले.<br>**अभ्यासाचे मुद्दे:** MS Office (Word, Excel, Power Point) ई-मेल व इंटरनेट वापर , वनविभाग संबंधित सॉफ्टवेअरचा उपयोग<br>**उद्देश:** कार्यालयीन कामकाजात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर. |
| | | | |



या अभ्यासक्रमामुळे प्रशिक्षणार्थीला वनव्यवस्थापन, पर्यावरण संरक्षण, जैवविविधतेचे संवर्धन आणि कायदेशीर चौकटीत राहून वनसेवा कार्यक्षमतेने पार पाडण्याची क्षमता प्राप्त होते. यामुळे नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षकांना प्रत्यक्ष क्षेत्रात काम करताना आवश्यक ज्ञान, कौशल्य व जबाबदारीची जाणीव होते. हे प्रशिक्षण कार्यक्षम, शिस्तबध्द व जबाबदार वनरक्षक घडवण्यासाठी उपयुक्त ठरते. वरील सर्व विषय वनरक्षक प्रशिक्षणाचा मूलभूत पाया आहेत.

03. **वनरक्षक सत्र क्र.** 63 **मधील प्रशिक्षणार्थी यांची** WCT **या विषयावर** Workshop

( **दि.** 20/01/2025 )



वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथील नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी तुकडी क्र. 63 चे सर्व प्रशिक्षणार्थी यांना **श्री. गणेश होनवाड** रा. बेंगलोर (Senior Program Manager, Training & Capacity Building) व्याख्याते यांनी **Wild Surakshe- Public Health and Safety Programme** या विषयावर प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण दिले.

या प्रशिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे वनरक्षक प्रशिक्षणार्थींमध्ये सार्वजनिक आरोग्य, वैयक्तिक सुरक्षितता आणि वनक्षेत्रात काम करताना उद्भावणाऱ्या आरोग्यविषयक संकटापासून बचाव याबाबतची जागरुकता निर्माण करणे होय.

**सत्रामध्ये समाविष्ट केलेले महत्वाचे मुद्दे:**

1. **सार्वजनिक आरोग्याचे मूलतत्व:** स्वच्छता व व्यक्तिगत आरोग्याची काळजी संसर्गजन्य रोग व त्यांचे प्रतिबंध.

2. **वनामध्ये सुरक्षिततेचे उपाय:** वन्यप्राण्यांपासून संरक्षण सर्पदंश आणि विषारी कीटकांपासून संरक्षण प्राथमिक उपचार प्रशिक्षण.

3. **आपत्कालीन परिस्थितीत कृती योजना:** अग्निशमन उपाय आपत्कालीन संपर्क यंत्रणा जलप्रदूषण आणि अन्न विषबाधेपासून प्रतिबंध.

4. **मानसिक आरोग्य व ताण व्यवस्थापन:** वनसेवेत मानसिकतणाव व्यवस्थापनाचे तंत्र.

**प्रशिक्षणाचा उद्देश:** प्रशिक्षणार्थींना वन क्षेत्रातील प्रत्यक्ष कामकाजासाठी शारीरिक व मानसिक दृष्टिकोनातून सक्षम बनवणे. आपत्कालीन परिस्थितींना सामोरे जाण्याची तयारी करून घेणे. आरोग्यविषयक आणि सुरक्षा संदर्भातील मूलभूत ज्ञान प्रदान करणे.

## 04. **वनरक्षक प्रशिक्षणार्थी यांना** GPS **व** GIS **या विषयावर प्रशिक्षण**.



वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथील नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी तुकडी क्र. 63 चे सर्व प्रशिक्षणार्थी यांना श्री. एन. व्हि. कुंभकर्ण,(से.नि. सहा.वनसंरक्षक ) यांनी **GPS व GIS** या विषयावर प्रशिक्षण दिले.

वनरक्षक प्रशिक्षणार्थी यांना दिलेल्या **जी.पी.एस.** (Global Positioning System) **आणि जी.आ.एस.** (Geographical Information System) विषयावरील प्रशिक्षणामुळे त्यांच्या तांत्रिक ज्ञानात आणि क्षेत्रीय कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ झाली आहे. या प्रशिक्षणातून पशिक्षणार्थींना जंगल क्षेत्राचे अचूक सर्वेक्षण, नकाशे तयार करणे, सिमारेषा ओळखणे, वनक्षेत्रातील बदलांचा मागोवा घेणे तसेच संसाधन व्यवस्थापनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्याची कौशल्ये प्राप्त झाली. यामुळे वनसंवर्धन, वनसंपत्तीचे शाश्वत व्यवस्थापन आणि गुन्हे प्रतिबंध या सर्वच कार्यांमध्ये अचूकता, पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढली आहे. या प्रशिक्षणाचा परिणाम म्हणून वनरक्षक अधिक तांत्रिकदृष्ट्या सक्षम, जबाबदार आणि आधुनिक पध्दतीने कार्य करणारे झाले आहेत, ज्याचा थेट फायदा वन विभागाच्या उद्दिष्टपूर्तीस आणि पर्यावरण संवर्धनास होणार आहे.

# 05. **वनरक्षक प्रशिक्षणार्थी यांना रोपवन या विषयावर प्रशिक्षण**.






वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथील नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी तुकडी क्र. 63 चे सर्व प्रशिक्षणार्थी यांना श्री. एस. एन. गुल्हाने, सहा. वनसंरक्षक (से.नि.) यांनी **रोपवन** या विषयावर प्रशिक्षण दिले.

नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांना रोपवन विषयाचे सखोल व व्यवहार्य ज्ञान देणे हे या प्रशिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट होते. प्रशिक्षणाद्वारे त्यांना बीज संकलन, प्रक्रिया, साठवण, रोपवाटिका व्यवस्थापन, योग्य लागवड तंत्र, पाणी व खत व्यवस्थापन तसेच कीड-रोग नियंत्रण या सर्व बाबींची माहिती देण्यात आली. वनसंवर्धन, पर्यावरण संरक्षण आणि जैवविविधतेचे जतन यामध्ये रोपवनाचे महत्व समजावून सांगण्यात आले. तसेच शासकीय वृक्षलागवड मोहिमा प्रभावीपणे राबविणे, नोंदवही लेखन, कामाचे नियोजन व प्रत्यक्ष क्षेत्रीय काम करताना जबाबदारीने कर्तव्य पार पाडणे यासाठी त्यांना सक्षम बनविणे हे देखील या प्रशिक्षणाचे महत्वाचे उद्दिष्ट होते.

06. वनरक्षक सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थींचे कवायत व खेळ.(माहे जानेवारी 2026)







# प्रशिक्षणार्थींचे कवायत व खेळ







## प्रशिक्षणार्थींचे कवायत व खेळ



नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक यांचे 6 महिने कालावधी प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थींना विविध व्यायामाचे प्रकार शिकवण्यात येतात. यामध्ये प्रशिक्षणार्थ्यांमध्ये उत्साह, आत्मविश्वास, संघ भावना तसेच सहकार्य वाढल्याचे प्रकर्षाने जाणवले.

सदर प्रशिक्षणार्थींना श्री. एस.एस. आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा व  श्री. महादेव धुर्वे, कंत्राटी सहा. कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांनी योग्य ते मार्गदर्शन केले.

# प्रशिक्षणार्थींचे कवायत व खेळ







# प्रशिक्षणार्थींचे कवायत व खेळ.







## प्रशिक्षणार्थींचे कवायत व खेळ.







# प्रशिक्षणार्थींचे कवायत व खेळ.









# प्रशिक्षणार्थींचे कवायत व खेळ.









07. वनरक्षक सत्र क्र.63 मधील प्रशिक्षणार्थींचे संस्थेतील क्षेत्रीय कामे. ( माहे जानेवारी 2026)

## ओपन जिम येथील साफ सफाई ( दि. 03/01/2026 )








वनरक्षक सत्र क्र.63 मधील प्रशिक्षणार्थींचे संस्थेतील क्षेत्रीय कामे.( माहे जानेवारी 2026)

**मेसच्या मागच्या परीसराची साफसफाई ( दि. 24/01/2026)**







**08. वनरक्षक सत्र क्र. 63 मधील प्रशिक्षणार्थींचे द्वितीय सत्र अभ्यासक्रमादरम्यान संस्थेतील परीसरामध्ये क्षेत्रीय अभ्यास दौरा. ( दि. 22/01/2026 )**

**( विषय: वनसर्व्हेक्षण, व्याख्याते श्री. एस. व्ही. कुंभकर्ण सर.)**







01. वनक्षेत्राचे मोजमाप करणे. 02. वनसंपत्तीचे मुल्यांकन. 03. वन व्यवस्थापनासाठी माहिती मिळवणे. 04. क्षेत्र सर्व्हेक्षण. 05. नकाशा तयार करणे. 06. नमुना पध्दत. 07. वृक्ष मोजमाप.

09. **गुगामल वन्यजीव विभाग, चिखलदरा यांच्या मार्फत** MSTrIPES Ecological APP **बाबत कार्यशाळा**.

**( दि. 02/01/2026)**




पर्यावरण संरक्षण व जैवविविधतेची माहिती एकत्रितपणे नोंदवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने **MSTrIPES Ecological APP** विकसित केली आहे. ही ॲप आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने वृक्ष व वनस्पतीविषयक माहिती डिजिटल स्वरुपात संकलित करण्यासाठी वापरली जाते.

**MSTrIPES Ecological APP** ही वन विभाग, महाराष्ट्र शासन यांची अधिकृत मोबाइल ॲप आहे. या ॲपच्या माध्यमातून राज्यातील विविध भागांतील झाडे, वनस्पती व पर्यावरणीय घटकांची नोंद केली जाते. ही प्रणाली पर्यावरणीय माहिती व्यवस्थापनासाठी उपयुक्त आहे.

MSTrIPES Ecological APP **चे मुख्य उद्दिष्ट**:

- वृक्ष व वनस्पतींची अचूक व शास्त्रीय माहिती संकलित करणे.
- डिजिटल पध्दतीने पर्यावरणीय नोंदी ठेवणे.
- जैवविविधता संवर्धनासाठी आधारभूत माहिती उपलब्ध करून देणे.
- पर्यावरणीय नियोजन व अभ्यासासाठी डेटाचा वापर करणे.

**ॲपची वैशिष्ट्ये**:

- मोबाइलवरुन थेट माहिती नोंद करण्याची सुविधा.
- GPS च्या सहाय्याने अचूक स्थान नोंद.
- झाडांचे फोटो अपलोड करण्याची सोय.
- पर्यावरणीय माहिती सुरक्षित व डिजिटल स्परुपात साठवण.
- माहितीचे विश्लेषण व भविष्यातील वापरासाठी उपयुक्तता.

**ॲपचे महत्व**:

MSTrIPES Ecological App मुळे पर्यावरण संरक्षणाच्या कामाला गती मिळते.

- वृक्षसंवर्धनासाठी उपयुक्त ठरते.
- पर्यावरण अभ्यास व संशोधनासाठी आधार देते.
- शासनाच्या पर्यावरणीय धोरणांना मदत करते.

**निष्कर्ष**:

**MSTrIPES Ecological App** ही पर्यावरणीय माहिती संकलनासाठी एक महत्वाची डिजिटल प्रणाली आहे. या ॲपच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षण, वृक्षगणना व जैवविविधता संवर्धन यासाठी प्रभावीपणे कार्य करता येते.

## 10. **सावित्रीबाई फुले यांची जयंती ( दिनांक** 03/01/2026)





वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे दि. 03/01/2026 रोजी **सावित्रीबाई फुले** यांची जयंती **संचालक,** कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते आदरपुर्वक व अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली.

सावित्रीबाई फुले जयंतीच्या निमित्ताने त्यांचे कार्य स्मरणात ठेवणे हे आपल्या सामाजिक कर्तव्याचा अविभाज्य भाग आहे. सावित्रीबाई फुले यांनी शिक्षण, स्त्रिसक्षमीकरण आणि सामाजिक समतेसाठी केलेले कार्य भारतीय समाजाच्या प्रगतीसाठी दिशादर्शक ठरले आहे. प्रतिकूल परिस्थितीतही त्यांना स्त्री शिक्षणाचा पाया मजबूत केला व अन्यायकारक सामाजिक रुढींना ठामपणे आव्हान दिले. त्यांचे विचार आजही समतामूलक, प्रगत आणि संवेदनशील समाजनिर्मितीस प्रेरणा देतात.

त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन संविधानात्मक मूल्यांवर आधारित समाज घडविण्यासाठी आपण सर्वांनी कटिबध्द राहणे आवश्यक आहे.

## 11. **जिजाऊ माँ साहेब व स्वामी विवेकानंद यांची जयंती ( दिनांक** 12/01/2026)




वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे दि. 12/01/2026 रोजी **जिजाऊ माँ साहेब व स्वामी विवेकानंद** यांची जयंती **संचालक**, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते आदरपुर्वक व अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली.

जिजाऊ माता व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीच्या निमित्ताने त्यांच्या राष्ट्रनिर्माणातील अमूल्य योगदानाचा गौरवपूर्वक स्मरण करणे अत्यंत आवश्यक आहे. राजमाता जिजाऊ यांनी छत्रपती शिवाजी महाराजांसारखा आदर्श, प्रजाहितदक्ष व स्वराज्यनिष्ठ राजा घडविला. त्यांच्या संस्कारांतून धर्मनिष्ठा, स्वाभिमान, न्यायप्रियता व जनतेप्रती कर्तव्यभावना रुजली. जिजाऊ मातांचे जीवन स्त्रीशक्ती, मातृत्व आणि राष्ट्रसेवेचे प्रेरणादायी उदाहरण आहे.

स्वामी विवेकानंद यांनी भारतीय तत्वज्ञान, अध्यात्म आणि सांस्कृतिक मूल्ये जागतिक स्तरावर प्रभावीपणे मांडली. " उठा, जागे व्हा आणि ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका " हा त्यांचा संदेश आजही युवकांना आत्मविश्वास, चारित्र्य आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा देतो. त्यांनी सामाजिक समता, मानवता आणि आत्मोन्नतीचा विचार समाजात दृढ केला.

जिजाऊ माता व स्वामी विवेकानंद यांचे विचार व कार्य हे राष्ट्राच्या वैचारिक आणि नैतिक अधिष्ठानाचे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन नागरिकांनी संविधानिक मूल्ये, सामाजिक एकोपा व राष्ट्रीय एकात्मता जपण्याचा संकल्प करणे, हीच त्यांच्या जयंतीनिमित्त खरी आदरांजली ठरेल.

## 12. **नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांची जयंती**.
## ( **दिनांक** 23/01/2026 )




वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे दि. 23/01/2026 रोजी **नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे** यांची जयंती **संचालक,** कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते आदरपुर्वक व अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली.

नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या राष्ट्रसेवा व समाजकार्यातील योगदानाचे स्मरण करणे महत्वाचे आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्याला क्रांतिकारक दिशा दिली. त्यांचे धैर्य, देशप्रेम आणि बलिदानाची भावना भारतीय जनतेसाठी सदैव प्रेरणादायी राहिली आहे. आजाद हिंद सेनेच्या माध्यमातून त्यांनी स्वातंत्र्य प्राप्तीसाठी सशस्त्र संघर्षाचा मार्ग स्वीकारत " तुम मुझे खून दो, मैं तुम्हें आजादी दूँगा " असा आत्मविश्वासपूर्ण संदेश दिला. त्यांच्या विचारांतून राष्ट्रीय एकात्मता, शिस्त आणि राष्ट्रसाठी सर्वस्व अर्पण करण्याची भावना दृढ झाली.

बाळासाहेब ठाकरे यांनी आपल्या प्रभावी नेतृत्वशैलीतून समाजजीवनावर खोलवर प्रभाव टाकला. त्यांनी मराठी अस्मिता, स्वाभिमान व सामाजिक न्यायाच्या प्रश्नांना प्राधान्य दिले. त्यांच्या स्पष्ट विचारसरणीने आणि निर्भीड भूमिकेने जनतेत जागृती निर्माण केली. लोकशाही व्यवस्थेत जनतेचा आवाज बुलंद करण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले.

नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांचे कार्य राष्ट्रभक्ती, नेतृत्व आणि सामाजिक जाणीवेचे प्रतीक आहे. त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन देशहित, सामाजिक बांधिलकी व राष्ट्रीय एकात्मतेसाठी कार्य करणे, हीच त्यांच्या जयंतीनिमित्त खरी आदरांजली ठरेल.

## 13. **प्रजासत्ताक दिवस ( दिनांक 26 जानेवारी 2026 )**



वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे दिनांक 26 जानेवारी 2026 रोजी भारताचा प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहात व शासकीय शिस्तीत साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे आयोजन संस्थेच्या प्रांगणात करण्यात आले होते. या प्रसंगी कु. मुक्माबाई वि टेकाळे, संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. कार्यक्रमादरम्यान राष्ट्रगीत गायन करण्यात आले तसेच संविधानातील मूल्ये, राष्ट्रीय एकात्मता व कर्तव्यभावना यांचे महत्व अधोरेखित करण्यात आले. अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सक्रिय सहभाग लाभला. या कार्यक्रमामुळे उपस्थितांमध्ये देशभक्तीची भावना दृढ होऊन संविधाननिष्ठा व शासकीय कर्तव्यांप्रती जागरुकता निर्माण झाली.

**कार्यक्रमातील सहभागी**:

- वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 मधील सर्व प्रशिक्षणार्थी.
- वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले कॅम्पा योजने अंतर्गत लिपीक / लेखापाल यांचे 45 दिवसीय पायाभूत प्रशिक्षणामधील सर्व प्रशिक्षणार्थी.
- वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथील सर्व अधिकारी / कर्मचारी.

# 14. **रक्तदान शिबीर ( दिनांक** 27/01/2026 )



प्रजासत्ताक दिनानिमित्त वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे दिनांक 27/01/2026 रोजी वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा व शासकीय ग्रामीण रुग्णालय, चिखलदरा यांच्या संयुक्त विद्यमाने महारक्तदान व आरोग्य तपासणी **शिबीराचे** आयोजन करण्यात आले.

भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे भव्य रक्तदान शिबीर आणि मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी जपत वन विभागाच्या प्रशिक्षणार्थींनी आणि कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन देशसेवेचा नवा आदर्श निर्माण केला. या उपक्रमात अनेकांनी रक्तदान करुन ‘ रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान ’ हा संदेश दिला.

कार्यक्रमाचे मुख्य आयोजक संस्थेच्या संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबीर पार पडले. याकामी श्री. एस.एस. आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच श्रीमती. एस.डी. घाटे, वनरक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा व  श्री. नितीन बघाये, कंत्राटी सहा. कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा व श्री. महादेव धुर्वे, कंत्राटी सहा. कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा आणि समस्त कर्मचारी वृंदाने शिबिराच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.

ग्रामीण रुग्णालय, चिखलदरा येथील वैद्यकीय अधीक्षक, आणि त्यांच्या संपूर्ण वैद्यकीय चमूने रक्त संकलन आणि आरोग्य तपासणीसाठी तांत्रिक व वैद्यकीय सहकार्य पुरवले. त्यांच्या या योगदानाबद्दल संस्थेच्या वतीने विशेष कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

‘ प्रजासत्ताक दिन हा केवळ उत्सव नसून तो कर्तव्याची जाणीव करून देणारा दिवस आहे. वनरक्षक आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणासोबतच सामाजिक जबाबदारी भान ठेवणे आवश्यक आहे. आजचे रक्तदान हे गरजू रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी मोलाचे ठरेल.’

**शिबीरामधील सहभागी**:

- वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 मधील सर्व प्रशिक्षणार्थी.
- वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले  कॅम्पा योजने अंतर्गत लिपीक / लेखापाल यांचे 45 दिवसीय पायाभूत प्रशिक्षणामधील सर्व प्रशिक्षणार्थी.
- वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथील सर्व अधिकारी / कर्मचारी.

15. **वनरक्षक सत्र क्र. 63 यांची विदर्भ अभ्यास दौरा परीक्षा**. ( दि. 29/01/2026 )



वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 63 यांचा प्रशिक्षणादरम्यान विदर्भ शैक्षणीक अभ्यास दौरा नियोजित कार्यक्रमानुसार आयोजित करण्यात आला होता. या अभ्यास दौऱ्याचा उद्देश प्रशिक्षणार्थींना विदर्भ विभागातील वनव्यवस्थापन, जैवविविधता, वनसंरक्षण, वन्यजीव व्यवस्थापन तसेच संबंधित प्रशासकीय कार्यपध्दतींचे प्रत्यक्ष ज्ञान मिळवून देणे हा होता.

सदर अभ्यास दौऱ्याच्या अनुषंगाने प्रशिक्षणार्थींची विदर्भ अभ्यास दौरा परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेद्वारे प्रशिक्षणार्थींचे अभ्यास दौऱ्यातील निरीक्षण, समज, प्राप्त ज्ञान तसेच त्याचा व्यावहारिक उपयोग करण्याची क्षमता यांचे मूल्यमापन करण्यात आले. परीक्षा ठरविण्यात आलेल्या अभ्यासक्रमानुसार व नियमानुसार घेण्यात आली असून, सर्व प्रशिक्षणार्थींनी परीक्षेत सहभाग घेतला.

ही परीक्षा प्रशिक्षण प्रक्रियेचा एक महत्वाचा भाग असून, प्रशिक्षणार्थींच्या एकूण प्रगतीचे व क्षेत्रीय ज्ञानाचे मूल्यमापन करण्यासाठी उपयुक्त ठरली आहे. सदर परीक्षा ही **संचालक,** कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे व नियोजनबध्द पध्दतीने पार पडली.

## 16. **हुतात्मा दिवस**. ( **दिनांक** 30/01/2026 )




